# भुजबळ नॉलेज सिटी

# मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## <u>वाचन प्रेरणा दिन अहवाल २०१८</u>

## <u>मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा</u>

**तारीख :- १५ ऑक्टोबर २०१८.**

**वेळ -: ग्रंथ प्रदर्शन: तारीख: १५ ते १७ ऑक्टोबर, २०१८**

**सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत**

**ठिकाण -: मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी.**

दिनांक १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती महामहीम भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस. शासनाने त्यांचा जन्म दिवस दर वर्षी वाचन प्रेरणा दिवस म्हणून सर्व स्तरावरून साजरा व्हावा असा निर्णय २०१५ यावर्षी घेतला. वाचन संस्कृती वृद्धिगत व्हावी हा त्यामागचा उद्देश. या अनुषंगाने मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.

अजब डिस्ट्रिब्युटर्स व रोहिणी डिस्ट्रिब्युटर्स नाशिक आणि मेट्स इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय भव्य ग्रंथ प्रदर्शन दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर २०१८ रोजी आयोजित करण्यात आले होते. माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. ग्रंथ प्रदर्शनाबद्दल महत्वाची बाब म्हणजे रुपये १०० पासून ६०० पर्यंतचे कोणतेही पुस्तक फक्त ७० रुपयात उपलब्ध होते. कॉलेजचे आमंत्रित मान्यवर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी ग्रंथ प्रदर्शनाला उस्फुर्त प्रतिसाद दिला. ग्रंथ प्रदर्शनाला एकूण ५२८ विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक आदींनी भेट दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, ग्रंथपाल श्री. नितीन भामरे, उपग्रंथपाल आरती कागदे व ग्रंथालय सहायक ज्योती जाधव तसेच इतर कर्मचार्यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता डॉ. सौ शेफाली भुजबळ व प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.

**<u>कार्यक्रमाचे समन्वयक :-</u>**

श्री. नितीन भामरे (ग्रंथपाल)

सौ.आरती कागदे (उपग्रंथपाल)

सौ.ज्योती जाधव (ग्रंथालय सहायक



1ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करतांना माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर.




२. ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करतांना माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर.




३. ग्रंथप्रदर्शनाची पाहणी करतांना एच आर प्रमुख श्री. दीपक परदेशी सर, श्री. मानके सर, श्री. सावंत सर ग्रंथपाल श्री. नितीन भामरे सर व इतर कर्मचारी.















४. ग्रंथप्रदर्शनाची पाहणी करतांना आदी ग्रंथालयीन कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, आणि विद्यार्थीवृंद